महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ६६ वी बैठक

| बैठक दिनांक | दिनांक ०६-१०-२०२१ |
|---|---|
| ठिकाण | मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधनी, जालना रोड, औरंगाबाद. |
| वेळ | सकाळी ११.०० वाजता |

## बैठकीची इतिवृत्त

बैठकीस उपस्थित सदस्यांनी सन्माननीय सदस्य डॉ वजाहत मिर्झा यांची एकमताने बैठकीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

**विषय क्रमांक. १: -** सन्माननीय सदस्यांच्या रजे बाबत.

**ठराव क्रमांक. १: -** बैठकीस सर्व १० सदस्य उपस्थित होते.

**विषय क्रमांक. २: -** दिनांक ०१.०९.२०२१ व ०३.०९.२०२१ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

**ठराव क्रमांक. २: -** (१) दिनांक ०१.०९.२०२१ व ०३.०९.२०२१ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(२) वक्फ मंडळाच्या बैठकींचे कार्यवृत्त (Proceedings) नोंदवुन घेण्याकरिता वक्फ मंडळाच्या सर्व बैठकीत एक लघुलेखक बैठकीच्या वेळी उपस्थित असावा. बैठकीत पारीत करण्यात आलेले ठराव त्याच वेळी बैठकीपुढे वाचून दाखविण्यात यावेत.

(३) वक्फ मंडळाच्या सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी वक्फ मंडळाच्या आगामी बैठकीपुढे उपस्थित रहावे.

(४) सन्माननीय सदस्य श्री. इम्तियाज जलील यांनी बैठकीपुढे एक व्हिडिओ क्लिप सादर केली. यामध्ये वक्फ मंडळ कार्यालयाच्या आवारात एक खाजगी व्यक्ती वक्फ मंडळातील काम करुन देतो असे सांगून रु.७०००/- ची मागणी करत असल्याची व त्यातून ४०००/- रुपये वक्फ मंडळाच्या एका क्षेत्रिय अधिका-याला देणार असल्याचे सांगत आहे, असे सदर क्लिप मध्ये दिसून येत आहे. या संदर्भात आणखी काही क्लिप्स उपलब्ध असल्याचेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. सदर प्रकरणाची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी व दोषी आढळून येणा-या कर्मचा-यां विरुध्द सक्त कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल वक्फ मंडळासमोर सादर करावा.

(५) या व यापुढील काळात होणा-या वक्फ मंडळाच्या सर्व बैठकांमध्ये वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ३६, ४०,४२ व ६९ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावांसंदर्भात, अश्या बैठकींचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वक्फ मंडळांनी मान्य केलेल्या अशा ठरावांवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

# (नोंदणी विभाग)

**विषय क्रमांक ३: -** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार नोंदणी प्रस्तावांना मान्यता देणे बाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या नोंदणीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण २४ प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरूअसून बैठकीच्या प्रत्यक्ष दिनांका पर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

**<u>Statement showing the list of registration proposal for final approval of Board</u>**

| Sr. No. | F. No. | Name of Waqf Instituion | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ABD/452 /2019 | Madarsa Masjid Umar Farukh | Indra Nagar | Ajantha | Sillod | Aurangabad |
| 2 | JLN/17/2 021 | Noorani Masjid | at Kumbhar Pimpalgaon | Kumbhar Pimpalgaon | Ghansawangi | Jalna |
| 3 | JLN/135/ 2021 | Husainiya Masjid wo Arbi Madarsa | At Dudhanwadi | Dudhanwadi | Badnapur | Jalna |
| 4 | BED/232 /2016 | Madarsa Arbi Talimul Quran & Masjid Panch Committee | at Wadwani. | Wadwani | Wadwani | Beed |
| 5 | BED/391 /2015 | Masood Biradari Sunni Muslim Kabrastan | Char Baoli Mohammadiya Colony | Beed | Beed | Beed |
| 6 | OSD/906 /2018 | Masjid | Mulaj | Mulaj | Umarga | Osmanabad |
| 7 | NDD/754 /2019 | Masjid Zahura Bi and Arabi Madarsa | at Dabhad | Ardhapur | Ardhapur | Nanded |
| 8 | HNG/909 /2017 | Madarsa Masjid Gausiya Arbiya Ahle Sunnatul Jamat | Mastanshah Nagar | Hingoli | Hingoli | Hingoli |
| 9 | RTG/319 /2019 | Jamatul Muslimeen Majre Kashi (Jame Masjid) | At post. Majrekashi | Majrekashi | Chiplun | Ratnagiri |
| 10 | RGD/843 /2018 | 1) Jame Masjid 2) Kabrastan 3) Gaiban Shahwali Baba Dargah | At Talekhar, Janjira | Chordhe | Murud | Raigad |
| 11 | PUN/361 /2020 | Masjid-e-Salaam | S. No. 37/5 Behind Cloud 9, Mohamedwadi | Pune | Pune | Pune |
| 12 | STR/107/ 2021 | Masjid - A- Aisha Waqf | At Patan | Patan | Patan | Satara |
| 13 | SGL/103/ 2021 | Jama Masjid wa Kabrastan trust | At Wategaon | Wategaon | Walwa | Sangli |
| 14 | JGN/255/ 2020 | Masjid Ishaq & Madarsa | Talimoddin, Jalgaon (Police) colony, MIDC | Jalgaon | Jalgaon | Jalgaon |
| 15 | JGN/243/ 2020 | Idgah Panch Commmitte | At Waghali | Waghale | Chalisgaon | Jalgaon |
| 16 | ADR/106 | Arfat Madarsa, | at Gotumbe | Rahuri | Rahuri | Ahmednagar |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 0/2015 | | Akhada Khurd, | | | |
| 17 | JGN/222/ 2016 | Masjid and Madarsa-e-Abeda | Shah Alam Nagar, Rustam Nagar | Amalner | Amalner | Jalgaon |
| 18 | JGN/412/ 2019 | Masjide Umar, | at Paldhi Khurd | Paldhi Bk | Dharangaon | Jalgaon |
| 19 | JGN/8/20 19 | Masjid E Iram | Shengola | Shengola | Jamner | Jalgaon |
| 20 | NSK/649 /2018 | Masjid & Maohammadiya Arbi Madarsa, | at Azad Nagar, property no, 42/1, Azadnagar, | Nandgaon | Nandgaon | Nashik |
| 21 | NSK/66/ 2021 | Madarsa Wo Masjid Amir Hamja Ahle Sunnat | At Gut No. 55/2/B Hinglaj Nagar | Malegaon | Malegaon | Nashik |
| 22 | ADR/93/ 2018 | Syed Shahdat Dargah, | Bepary Mohalla, Collector Kachery Nagar, | Ahmednagar | Ahmednagar | Ahmednagar |
| 23 | ADR/766 /2018 | Ahle Sunnatul Jamat Kabarastan | Sarula Kasar | Sarula Kasar | Ahmednagar | Ahmednagar |
| 24 | ADR/774 /2012 | Masjid Muslim | At Jeur | Jeur | Newasa | Ahmednagar |

**उपरोक्त २४ प्रकरणे मी स्वतः तपासली असून ती बरोबर आहेत. मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.**

**(अनिस शेख)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**ठराव क्रमांक ३: -** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार उपरोक्त एकुण २४ नोंदणी च्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त २४ नोंदणीच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

# (चौकशी विभाग)

**विषय क्रमांक. ४: -** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(ए) नुसार योजना मंजूरीसाठीच्या प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या योजना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण १७ प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरूअसून बैठकीच्या प्रत्यक्ष दिनांकापर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

**Under Section 69 of the Waqf Act 1995 to be Kept in Board Meeting.**

| Sr. No. | File No | District | Name of Institution |
|---|---|---|---|
| 1. | 69/32/2021 | Pune | Madarsa Amina Talimul Quran Gat No. 218/A, Koyana HSNG Sect Rupinagar, village. Tadwade, Tq. Haveli, Dist. Pune |
| 2. | 69/33/2021 | Pune | Jumarhat Itehadak, Muslimeen, Gut No. 170/7/2, Village. Akurdi, Tq. Haveli, Dist. Pune |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | 69/361/2019 | Solapur | Madina Masjid Wo Arabi Madarsa, At Borale, Village. Borale, Tq. Mangalweda, Dist. Solapur |
| 4. | 69/50/2021 | Satara | Bakar Kasab Masjid Mangalwar Peth, Village. Satara, Tq. & Dist. Satara |
| 5. | 69/32/2017 | Nashik | Sunni Jama Masjid, Madarsa and Kabrastan Trust, Naygaon, Village. Naygaon, Tq. Sinner, Dist. Nashik |
| 6. | 69/117/2018 | Nashik | Shahi Masjid, At Ghas Bazar, Villge. Nashik, Tq. & Dist. Nashik |
| 7. | 69/468/2017 | Mumbai | Declaration of Trust made by Mohammad Bin Ahmed Bin Hajras, 14 Arab Line, Village. Mumbai, Tq. & Dist. Mumbai |
| 8. | 69/65/2016 | Thane | Kabrastan, At Post Babgaon, Village. Babgaon, Tq. Bhiwandi, Dist. Thane |
| 9. | 69/13/2017 | Thane | Babgaon Jumma Masjid, At Post Babgaon, Village. Babgaon, Tq. Bhiwandi, Dist. Thane |
| 10. | 69/121/2017 | Nagpur | Madni Madarsa, Subhash Ward Mangarwari Ramtek, Village. Ramtek, Tq. Ramtek, Dist. Nagpur |
| 11. | 69/315/2019 | Nagpur | Idara Umar Farooque and Madarsa, At Ward No. 43, Shivshaktinagar, Wanjri, Tipu Sultan Chowk, Village. Nagpur, Tq. & Dist. Nagpur |
| 12. | 69/628/2015 | Nanded | Noori Masjid & Arbi Madarsa, Maktab Ashraf Nagar, Hingoli Gate, Village. Nanded, Tq. & Dist. Nanded |
| 13. | 69/391/2019 | Akola | Gulam Chisti Masjid Trust, at Balapur, Tq. Balapur, Dist. Akola |
| 14. | 69/06/2016 | Ahmednagar | Hasmatbi Arabi Madarsa and Masjid, at Momin Akhada, Shaikh Wasti, Momin Akhada, Tq. Rahuri, Dist. Ahmednagar |
| 15. | 69/37/2021 | Ahmednagar | Anjuman E Islam Madarsa o Masjid, Hasanpur, Village. Hasanpur, Tq. Rahta, Dist. Ahmednagar |
| 16. | 69/202/2019 | Pune | Sayyed Jalaluddin Dargah Ganj Peth, Tq. & Dist. Pune |
| 17. | 69/248/2020 | Kolhapur | Anjuman Ittehadul Islam, Village. Ajra, Tq. Ajra, Dist. Kolhapur |

**उपरोक्त १७ प्रकरणे मी स्वतः तपासली असून ती बरोबर आहेत. मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.**

**(अनिस शेख)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**ठराव क्रमांक. ४: -** **वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ (ए) नुसार योजना मंजूरीसाठी प्राप्त झालेल्या उपरोक्त १७ प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असून उपरोक्त १७ प्रस्तावांना मंजूरी देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. ५: -** **वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फा संस्थांच्या बदलाबाबत प्रस्तावांना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण ८ प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरूअसून बैठकीच्या प्रत्यक्ष

दिनांका पर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

**Under Section 42 of the Waqf Act 1995 to be Kept in Board Meeting.**

| Sr. No. | File No | District | Name of Institution |
|---|---|---|---|
| 1 | 42/89/2018 | Sangli | Dargah of Daval Malik and Masjid, Village. Hospeth, Tq. Jat, Dist. Sangli |
| 2 | 42/379/2019 | Solapur | Hajrat Shaikh Nuruddin Chisti Rahematullah Alleh Dargah, At Akkalkot, Village. Akkalkot, Tq. Akkalkot, Dist. Solapur |
| 3 | 42/532/2019 | Jalgaon | Sunni Shahi Jama Masjid Tadvi Muslim Panch Committee, At Post Pal, Village. Pal, Tq. Raver, Dist. Jalgaon |
| 4 | 42/96/2020 | Mumbai | Seth Haji Rahmatoola Suleman Dawooni Mosque Trust At 166, Kambekar street. Village. Mumbai, Tq. & Dist. Mumbai |
| 5 | 42/107/2020 | Mumbai | Seth Haji Rahmatoola Suleman settlement Found 156, Kambekar Street, Mumbai |
| 6 | 42/145/2020 | Pune | Dargah Khwaja Mukhadam Shaikh Salahuddin Siddiqui Ghasi Chishti Nizami, known as Shaikh Salla Dargah, Kasba Peth, Pune, Tq. & Dist. Pune |
| 7 | 42/163/2021 | Ahmednagar | Masjid E Madina At Post Loni Haveli, Tq. Parner, Dist. Ahmednagar |
| 8 | 42/244/2021 | Akola | Gulam Chisti Masjid, At Balapur, Village. Balapur, Tq. Balapur, Dist. Akola |

**उपरोक्त ८ प्रकरणे मी स्वतः तपासली असून ती बरोबर आहेत. मान्यतेसाठी शिफारस करीत आहे.**

**(अनिस शेख)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**ठराव क्रमांक. ५: -** **वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्राप्त झालेल्या उपरोक्त ८ प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त ८ प्रस्तावांना मंजूरी देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र. ६-** **अंगड शाह तकीया व आशुरखाना, भवानी पेठ, पुणे, ता. जि. पुणेच्या व्यवस्थापन समिती बाबत.**

अंगड शाह तकीया व आशुरखाना ट्रस्ट, पुणे ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतूदीनुसार बी-३५७ पुणे अन्वये नोंदणीकृत संस्था आहे. दि.०१.०१.१९९६ पासून संपुर्ण महाराष्ट्रात वक्फ अधिनियम १९९५ लागू झालेला असून सदर संस्था वक्फ संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून MSBW/PUN/६७/२००८ अन्वये दि.२६.०२.२००८ रोजी या संस्थेची रितसर नोंदणी करण्यांत आलेली आहे.

सदर संस्थेच्या व्यवस्थापनरशी संबंधीत न्यायप्रविष्ठ प्रकरणांत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे सि.आर.ए. क्र. २२२/२०१८ दि.१६.०८.२०१९ मध्ये खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

Per Court-

1) Learned counsel for the petitioner submitted that the petitioner is entitled to a declaration that the plantiff is a Mutawalli by mode of succession i.e. Sadguru to Sadguru. Learned counsel for the petitioner submitted that though the Waqf deed was placed on record prescribing the mode of succession. The said deed has not been considered in the proper perspective by the Waqf Tribunal. It is pertinent to note that the tribunal has observed that no rights of the Waqf institution are infringed and as no cause of action accrues to the Waqf institution and therefore,

the suit in the name of the Waqf claiming relief for P.W. 1 i.e. Sharfuddin S/o. Shamshuddin alias Roshan Dilshah cannot be considered to be maintainable.

2) It is, Further, pointed out by the learned counsel for the petitioner that the P.W. 1. i.e. Sharifuddin S/o.Shamshuddin Alias Dilshah has already files the application before the board claiming the right of Mutawalliship/Sadguru and his application is pending. The tribunal, therefore, observed that during the pendency of the application the petitioner should not have invoked the jurisdiction of the tribunal.
3) In my opinion, once the tribunal came to a conclusion that suit before the tribunal is not maintainable in the name of the Wakf and further, that the suit is also not maintainable on the ground that an application has already been filed by the petitioner before the Board claiming right of Mutawalliship, the tribunal need not have adjudicated the merits of the claim made by the petitioner in the said suit.
4) Needless to mention, the application made by the P.W. 1 i.e Sharifuddin S/o Shamshuddin alias Roshan Dilshah before the Board claiming the rights of Mutawalliship of the institution will be decided on its own merits. Any observations made by the tribunal while dismissing the said suit on merits will not come in the way of the Board while deciding the application made by the P.W 1 i.e. Sharifuddin S/o Shamshuddin alias Roshan Dilshah on its own merits. The Board not to be influenced by any observation made by the Tribunal in the order impugned in this petition.
5) In this view of the matter, Keeping all contentions of the petitioner open, the Board is requested to hear the application made by the P.W 1 i.e. Sharifuddin S/o Shamshuddin alias Roshan Dilshah for deciding hid claim regarding right of Mutawalliship expeditiously and preferably within the period of nine months from today. While considering the application filed by the P.W 1, the Board shall consider the said application on its own and without being influenced by any observation made by the tribunal in the impugned order.
6) The civil Revision Application stands disposed of in the above terms.

मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सदर प्रकरण मा. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बैठकी मध्ये ठेवण्यात आलेले असुन वक्फ अधिनियम १९९५च्या कलम ६३ अन्वये मुतवल्लीचे नेमणुकी करण्यासाठी संबंधीतांची सुनावणी घेवुन सदर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या अर्जाची चौकशी करण्यासाठी सदर प्रकरण महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समोर दि. ०२.०९.२०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली होती सदर प्रकरण आता निर्णयासाठी बंद करण्यात आलेले आहे.

**ठराव क्रमांक. ६: -सदर प्रकरण पुढे ढकलण्यात आले.**

**विषय क्र. ७: मदरसा तालीमुल कुरान, मोतेबर खान शाही मकबरा मस्जिद, पिर सादेक अली बाबा दर्गा वक्फ, कलवा तलाव मकबरा, ता. कल्याण, जि. ठाणेच्या वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० अन्वयें मिळकतीची घोषणा करणे बाबत.**

श्री. जाकीर हुसेन अब्दुल जब्बार शेख व इतर १०, रा. कल्याण, ता. कल्याण, जि. ठाणे यांनी दि. ३०.०७.२००७ रोजी श्री. मेहबुब फत्तुभाई खान व इतर ५ विरूध्द वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० अन्वये या कार्यलयास मदरसा तालीमुल कुरान मकबरा मोतेबर शाह मकबरा मोहम्मद सादीक अली बाबा दर्गा, कल्याण, ता. कल्याण, जि. ठाणे ही मिळकत वक्फ म्हणुन घोषण करणे बाबत अर्ज केले होते.

प्रकरणांत या कार्यालयाचे दि. १७.०४.२०१३ अन्वये खालील आदेश दिले होते.

Order

The application dated 30.07.2007 filed by the applicants U/s 40 of the Waqf Act, 1995 is hereby rejected.

श्री. मेहबुब फत्तुभाई खान, रा. ४६/१५, धुरू चॉल, जुना फिश मॉकेट, कल्याण (पश्चिम), जि. ठाणे यांनी दि. १८.०७.२०१८ (प्राप्त दि. ३१.०८.२०१८) रोजी अर्ज देवुन या कार्यालयाच्या निदर्शनास आणुन दिले आहे की, मदरसा तालीमुल कुरान, मोतेबर खान शाही मकबरा मस्जिद, पिर सादेक अली बाबा दर्गा वक्फ, काला तलाव मकबरा, ता. कल्याण, जि. ठाणेच्या संचिका क्र. चौकशी नं. ४०/०६/२००७ मध्ये मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद (कॅम्प ठाणे) येथे वक्फ अर्ज क्र. ६०/२०१३ जाकीर हुसैन अब्दुल जब्बार शेख व इतर विरूध्द मेहबुब फत्तेभाई खान व इतर मध्ये दि.०९.०२.२०१८ रोजी खालील प्रमाणे आदेश दिलेले आहे.

Order:

1. The application is allowed.

2. The impugned judgment and order dated 17.04.2013 in Case No. 40/06/207 passed by the Chief Executive Officer of the Maharashtra State Board of Waqf, Aurangabad is hereby quashed and set aside and the matter is remanded back to the Board for deciding afresh.
3. The Board is directed to decide the matter afresh by giving opportunity of hearing to both the parties in accordance with the provisions of law.
4. The Board is directed to decide the matter within a period of six months from the date of appearance of both the parties.
5. Both the parties are directed to appear before the Board on 06.03.2018 and seek necessary instruction.
6. The record and proceeding Case No. 40/06/2007 be sent back to the Maharashtra State Board of Waqf, Aurangabad along with the certified copy of this judgment.
7. Dictated and pronounced in open Court.

मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद (कॅम्प ठाणे) यांच्या आदेशान्वये सदर संस्थेच्या वक्फ मिळकती बाबत संबंधीतांची सुनावणी घेवुन व चौकशी करण्यासाठी सदर प्रकरण महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समोर दि. ०२.०९.२०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली होती सदर प्रकरण आता निर्णयासाठी बंद करण्यात आलेले आहे.

**ठराव क्रमांक. ७: - सदर प्रकरण पुढे ढकलण्यात आले.**

**विषय क्र. ८- वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये पीर हजरत दावल मलीक, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगरच्या व्यवस्थापन समितीच्या प्रस्तावीत योजना अर्जाच्या अनुषंगाने निर्णय घेणे बाबत.**

पीर हजरत दावल मलीक, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार ई-६६ अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

दि. ०१.०१.१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असून सदर संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून ही महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये तीची रितसर नोंदणी करण्यात आली असून तिचा नोंदणी क्र. MSBW/ADR/४९८/२०१९ असा आहे.

श्री. मजीद खान इस्माईल खान पठाण व इतर, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर यांनी दि.२०.०४.२०१९ रोजी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ अन्वये सदर संस्थाच्या व्यवस्थापन समितीची प्रस्तावीत योजना मंजुरीसाठी या कार्यालयास अर्ज सादर केलेले आहे.

प्रकरणांत श्री. शेख जहागीर इब्राहिम, रा. कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर यांनी दि. २१.०८.२०१९ रोजी सदर योजना अर्जावर आक्षेप अर्ज दाखल केलेले आहे.

श्री. शेख परवेज युसूफ मुजावर, पिर हजरत दावल मलीक, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर यांनी दि.१०.११.२०२० रोजी सदर योजना अर्जावर आक्षेप अर्ज दाखल केलेले आहे.

श्री. शोराब युसुफ शेख, रा. कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर यांनी दि.१४.०१.२०२१ रोजी सदर योजना अर्जावर आक्षेप अर्ज दाखल केलेले आहे.

सदर वक्फ संस्था पीर हजरत दावल मलीक, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगरच्या दैनंदिन व्यवस्थापना देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी सदर संस्थेच्या प्रस्तावीत योजना अर्जामध्ये आक्षेप असल्याने सदर प्रकरण महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समोर दि. ०२.०९.२०२१ रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते सदर प्रकरण निर्णयासाठी बंद करण्यात आलेले आहे.

**ठराव क्रमांक. ८: - सदर प्रकरण पुढे ढकलण्यात आले.**

**विषय क्र. ९ - निमजगा माळ इदगाह, मिरज, ता. मिरज, जि. सांगलीच्या व्यवस्थापन समितीच्या वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये प्रस्तावीत योजना अर्जा बाबत.**

निमजगा माळ इदगाह, मिरज, ता. मिरज, जि. सांगली ही संस्था महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-२२ (सांगली) अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

दि. ०१.०१.१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असून सदर संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून ही MSBW/SGL/३१/२००८ अन्वये रितसर नोंदणी करण्यात आलेली आहे. मा.धर्मादय आयुक्ताकडील अनुसूचि-१ व योजनेमधील सदर संस्थेच्या संबंधीत असलेली वक्फ मिळकतीची व विश्वस्तांची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

श्री. अय्याज इलियास नायकवाडी व इतर, रा. २६०, हडको कॉलोनी, ईदगाह नगर, मिरज, ता. मिरज, जि. सांगली यांनी २९.०७.२०१६ रोजी सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(५) अन्वये तात्पुत्या स्वरूपात अॅडहोक कमिटीची नियुक्ती करणे बाबत विनंती केलेली आहे.

प्रकरणांत श्री. मुबारक बुऱ्हानोद्दीन खतीब व इतर, रा. मिरज, ता. मिरज, जि. सांगली यांनी दि. २७.०७.२०१६ रोजी दुसरा अर्ज तात्पुत्या स्वरूपात अॅडहोक कमिटी व प्रस्तावीत योजना अर्ज सादर करून योजना मंजुर होईपर्यंत तात्पुत्या स्वरूपात अॅडहोक कमिटी नियुक्ती करण्यासाठी अर्ज केलेला आहे.

प्रकरणांत श्री. मेहबुब अली मोहम्मद गौस, रा. गुरूवार पेठ, देवल मिल्क डेअरी, मानेर कॉम्पलेक्स समोर, मिरज, ता. मिरज, जि. सांगली यांनी दि. ३०.०७.२०१६ रोजीचे योजना अर्जावर आक्षेप दाखल केलेला आहे.

श्री. अय्याज इलियास नायकवाडी व इतर, रा. २६०, हडको कॉलोनी, ईदगाह नगर, मिरज, ता. मिरज, जि. सांगली यांनी श्री. मुबारक बुहानोद्दीन खतीब यांनी दाखल केलेल्या अॅडहोक कमिटी व योजना अर्जावर दि. ०३.०८.२०१६ रोजीचे आक्षेप दाखल केलेले आहे.

तसेच श्री. अय्याज इलियास नायकवाडी व इतर, रा. २६०, हडको कॉलोनी, ईदगाह नगर, मिरज, ता. मिरज, जि. सांगली यांनी दि. ०८.०८.२०१६ रोजी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये योजना अर्ज मंजुरीसाठी दाखल केलेले आहे.

सदर संस्थेच्या योजना अर्ज, तात्पुत्या स्वरूपात अॅडहोक कमिटीचे अर्ज व प्रकरणांत आक्षेप प्राप्त झाल्याने सदर संस्थेची चौकशी करण्यासाठी सदर प्रकरण महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समोर दि. ०२.०९.२०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आले होते. सदर प्रकरण निर्णयासाठी बंद करण्यात आलेले आहे.

**ठराव क्रमांक. ९: - सदर प्रकरण पुढे ढकलण्यात आले.**

**विषय क्र. १०- खाचर पाईप रोड मॉस्क, १९४, न्यु मिल वार्ड, कुर्ला, मुंबईच्या व्यवस्थापन समितीची फेरफार अर्ज बाबत.**

खाचर पाईप रोड मॉस्क, १९४, न्यु मिल वार्ड, कुर्ला, मुंबई ही संस्था महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-६९१ (मुंबई) अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

दि. ०१.०१.१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असुन सदर संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असुन ही MSBW/MUM/१०६/२००९ अन्वये रितसर वक्फ मंडळात नोंदणी करण्यात आलेली आहे. अनुसूचि-१ व योजनेमधील सदर संस्थेच्या संबंधीत असलेल्या वक्फ मिळकतीची व विश्वस्तांची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

श्री. अताउल्ला खान, खाचर पाईप रोड मॉस्क, न्यु मिल वार्ड, कुर्ला, मुंबई यांनी दि. ०७.०८.२०१८ रोजी अर्ज देवुन या कार्यालयास विनंती केली आहे की, खाचर पाईप रोड मॉस्क, १९४, न्यु मिल वार्ड, कुर्ला, मुंबई यांनी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये सदर संस्थाची व्यवस्थापण समितीची प्रस्तावीत योजना मंजुरीसाठी या कार्यालयास अर्ज सादर केलेले आहे.

प्रकरणांत श्री. शफीक अहमद पीर मोहम्म शेख, रा. ४१ ऊनवाला कम्पाऊंड, रूम नं. ४, पाईप रोड, संजय स्टोर जवळ, कुर्ला (पश्चिम), मुंबई व इतर ५ लोकांनी सदर योजना अर्जावर आंक्षेप अर्ज दाखल केलेले आहे.

वक्फ मंडळात प्रस्तावीत योजना अर्ज व प्रकरणांत आक्षेप प्राप्त झाल्याने सदर संस्थेची चौकशी करण्यासाठी व सदर संस्थेच्या प्रस्तावना योजना अर्ज वेगवेगळे लोकांनी सादर केलेले प्रस्तावाना दाखल असून सदर प्रकरण महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समोर दि. ०२.०९.२०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली असून सदर प्रकरण निर्णयासाठी बंद करण्यात आलेले आहे.

**ठराव क्रमांक. १०: - सदर प्रकरण पुढे ढकलण्यात आले.**

**विषय क्र. ११. शेख रमजान शेख चॉद ट्रस्ट, (नोन एस पाईप रोड व खाचर मेन्टेनन्स वक्फ), पाईप रोड, कुर्ला, मुंबईच्या व्यवस्थापन समितीची फेरफार अर्ज बाबत.**

शेख रमजान शेख चॉद ट्रस्ट, (नोन एस पाईप रोड व खाचर मेन्टेनन्स वक्फ), पाईप रोड, कुर्ला, मुंबई ही संस्था महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-३८ (मुंबई) अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

दि. ०१.०१.१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असुन सदर संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असुन ही MSBW/MUM/१०७/२००९ अन्वये रितसर वक्फ मंडळात नोंदणी करण्यात आलेली आहे. अनुसूचि-१ व योजनेमधील सदर संस्थेच्या संबंधीत असलेल्या वक्फ मिळकतीची व विश्वस्तांची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

श्री. अताउल्ला खान, खाचर पाईप रोड मॉस्क, न्यु मिल वार्ड, कुर्ला, मुंबई यांनी दि. ०७.०८.२०१८ रोजी अर्ज देवुन या कार्यालयास विनंती केली आहे की, शेख रमजान शेख चॉद ट्रस्ट, (नोन एस पाईप रोड व खाचर मेन्टेनन्स वक्फ), पाईप रोड, कुर्ला, मुंबई यांनी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये सदर संस्थाची व्यवस्थापण समितीची प्रस्तावीत योजना मंजुरीसाठी या कार्यालयास अर्ज सादर केलेले आहे.

प्रकरणांत श्री. शफीक अहमद पीर मोहम्म शेख, रा. ४१ ऊनवाला कम्पाऊंड, रूम नं. ४, पाईप रोड, संजय स्टोर जवळ, कुर्ला (पश्चिम), मुंबई व इतर ५ लोकांनी सदर योजना अर्जावर आक्षेप अर्ज दाखल केलेले आहे.

वक्फ मंडळात प्रस्तावीत योजना अर्ज व प्रकरणांत आक्षेप प्राप्त झाल्याने सदर संस्थेची चौकशी करण्यासाठी व सदर संस्थेच्या प्रस्तावीत योजना अर्ज वेगवेगळे लोकांनी सादर केलेले आक्षेप दाखल असून सदर प्रकरण महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समोर दि. ०२.०९.२०२१ रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली असून सदर प्रकरण निर्णयासाठी बंद करण्यात आलेले आहे.

**ठराव क्रमांक. ११: - सदर प्रकरण पुढे ढकलण्यात आले.**

**विषय क्र. १२- मस्जिद, नक्षत्रवाडी, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबादचा वक्फ संस्थेकरिता व्यवस्थापकीस समितीचा नियुक्ती करणे बाबत.**

मस्जिद नक्षत्रवाडी, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद नोंदणी क्र. MSBW/ABD/६२८/२०१४ च्या व्यवस्थापकीय समितीच्या विश्वस्तांची नियुक्ती करणेसाठी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथील रिट पिटीशन क्र. ११६९६/२०१५ मधील दि. २७.०१.२०१६ रोजीच्या आदेशास अनुसरून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बैठक दि. १२.०६.२०१७ ठराव क्र. २१ अन्वये सदर वक्फ संस्थेकरिता सुयोग्य मंजुर करण्यांत यावी याबाबत निर्देश दिले होते, प्रकरणांत या कार्यालयाचे पत्र क्र. मरावंम/चौकशी/१४२/२०२१ दि. ११.०१.२०२१ रोजी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये सुधारीत योजना मंजुर करण्यात आली आहे. या योजनेस अनुसरून सदर वक्फ संस्थेच्या दैनंदिन कामकाज व व्यवस्थापनासाठी श्री. सलीम पटेल वाहेगावकर यांनी दि. ०८.०७.२०२१ रोजी एकुण ७ सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी अर्ज सादर केला असून सदर अर्ज वक्फ मंडळाच्या विचारार्थ निर्णयासाठी सादर करण्यांत येत आहे.

**ठराव क्रमांक. १२: - सदर प्रकरण पुढे ढकलण्यात आले.**

# ( सियानत-विभाग )

**विषय क्रमांक. १३: - अक्सा मस्जीद ट्रस्ट, विटा ता. खानापुर जि. सांगली बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

श्री. मोमीन जमीर ऐनुद्दिन व इतर रा. विटा ता. खानापुर जि.सांगली यांनी दि.१/६/२०२१ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, अक्सा मस्जीद ट्रस्ट, विटा ता. खानापुर जि. सांगली वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र.MSBW/SGL/२४४/२०१८ दि.१७/१०/२०१८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. वादळामुळे मस्जीद पुर्णपणे नादुरुस्त होऊन पत्र्याचे शेड उडून गेले आहे. वक्फ संस्थेचे सदस्यांनी त्यांच्या सभेत ठराव घेवून मस्जीदचे पत्र्याचे शेड काढून बांधकाम करण्याचे ठरविले आहे. मस्जीदचे बांधकाम वर्गणी, देणगी व दानशुरांच्या आर्थीक सहाय्याने करण्याचे निश्चित केले आहे. वक्फ संस्थेच्या व्यवस्थापना साठी योजना दाखल करण्यास अर्जदारास कळविण्यात आले आहे.

मौजे विटा येथील गट क्र. २०३ पैकी क्षेत्र ०.०३ आर जमीन श्री. आयुब नुरमहंमद मुल्ला यांनी वक्फनामा करुन अक्सा मस्जीद ट्रस्टच्या नावाने वक्फ मंडळात नोंदणी केलेली आहे. त्याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व: श्री.पांडूरंग महादेव धनवडे यांची मिळक्त, पश्चिम : जमीन ऐनुद्दिन मोमीन यांची मिळकत दक्षिण : २० फुट रुंदीचा रस्ता, उत्तर : श्री.चंदु रुपान पवार यांची मिळकत

प्रस्तावित बांधकाम ३८.५२ चौ.मि. जागा मध्ये होणार असून बांधकामासाठी एकुण खर्च ९,०३,१००/-रुपये इतका येणार आहे. सदरचा खर्च वर्गणी, देणगी व दानशुरांच्या आर्थीक सहाय्याने करण्यात येणार आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत खालील कागदपत्राची पुर्तता केली आहे. १)वक्फ संस्था नोंदणी आदेश, २)जोडपत्र व प्रमाणपत्र ३) ७/१२ ४)ऑडिट रिपोर्ट, ५)अध्यक्षाचे आधार कार्ड, ५) शपथपत्र ६)बांधकाम प्लॅन ईस्टीमेट, ७) प्रस्तावित जागाचे फोटो. ८) NOC फी रक्कम २०००/- ची पावती दिली आहे.

उपरोक्त प्रकरणात प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांनी पत्र क्र.पी/एसएनटी/४७६/२०२१ दि.२१/०९/२०२१ अन्वये अहवाल सादर मस्जीद बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याची शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार अक्सा मस्जीद चे बांधकामास नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. १३:- मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन आदेश निर्गमित करावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. १४: - मस्जीद व कब्रस्तान ट्रस्ट, मौजे बल्यानी ता. कल्याण जि. ठाणे बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोकण विभाग, मुंबई यांनी पत्र क्र.वक्फ/एसएनटी-३०१/१४२/२०१९ दि.२५/७/२०१९ अन्वये अहवाल सादर केले की, मस्जीद व कब्रस्तान ट्रस्ट, मौजे बल्यानी ता.कल्याण जि.ठाणे ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ नुसार क्र.MSBW/THN/३५४/२०१५ दि.३०/०६/२०१५ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील मस्जीदच्या उत्तर बाजुस कब्रस्तान असून वक्फ संस्थेच्या चारही बाजुने संरक्षण भिंती बांधलेल्या आहे. सदर मस्जीद न.भु.क्र १३/१२ मध्ये स्थीत असून फार जुनी व सध्यास्थितीत जिर्ण झालेली आहे. बल्यानी परिसरात झपाटयाने लोकसंख्या वाढत आहे तसेच मस्जीद अंबिवली टिटवाला या मुख्य रस्त्यालगत असल्याने नमाज पठण करणा-यांची संख्या दिवसंदिवस वाढत असल्याने नमाज पठणसाठी जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे मस्जीदच्या विश्वस्तांनी दि.१३/५/२०१७ रोजीच्या त्यांच्या सभेत ठराव घेवून मस्जीदचे पुर्नविकास/नुतनीकरण करण्याचे ठरविले आहे. मस्जीदचे एकुण क्षेत्र ३ गुंठे असून सर्वे न.१३/१२ मध्ये बांधलेली आहे वक्फ संस्थेची सर्वे

नं.१३/१३ मध्ये १ गुंठा जमीन मोकळी आहे. दोन्ही जागा मिळून ४ गुंठे मध्ये मस्जीदचे नुतनीकरण व वाढीव बांधकाम करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार जनाब इलियास गफुर रईस, सचिव मस्जीद व कब्रस्तान ट्रस्ट, बल्याणी ता.कल्याण जि. ठाणे यांनी दि.६/५/२०१९ अन्वये अर्ज देवून विनंती केली आहे. बांधकाम प्लॅननुसार मस्जीदचे G+३ Floor बांधण्यात येणार आहे प्रत्येक फ्लोअरचे क्षेत्र ३८४.९० चौ.मि. मध्ये बांधकाम होणार आहे.

उपरोक्त मस्जीदचे नुतनीकरण व वाढीव बांधकाम करणे गरजेचे असल्याने अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जावर निर्णय घेण्याची शिफारस प्रादेशिक वक्फ अधिकारी कोकण विभाग, मुंबई यांनी केली आहे.

अर्जदार यांनी दि.२/७/२०२१ रोजीच्या अर्जासोबत खालील कागदपत्राची पुर्तता केली आहे. १)वक्फ संस्था नोंदणी आदेश, २)नोंदणी प्रमाणपत्र ३)बांधकामसाठी वक्फ संस्थेने घेतलेला ठरावाची प्रत, ४) ७/१२ व चौकशी नोंदवहीची प्रत ५)ऑडिट रिपोर्ट वक्फ फंड पावती, ६)शेडयुल-१,२ ची प्रत, ७)बांधकाम प्लॅन, ८)प्रस्तावित जागाचे फोटो.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार मस्जीदचे नुतनीकरण वाढीव बांधकामास नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. १४: -** **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन आदेश निर्गमित करावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. १५:-** **कब्रस्तान व चिल्ला चिमन शाह वली, मौजे दाऊतपुर ता.भोकरदन जि.जालना कब्रस्तानला संरक्षण भिंती बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत**

श्री.बी.बी.पठाण रा. बायजीपुरा औरंगाबाद यांनी दि.१५/९/२०२१ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, कब्रस्तान व चिल्ला चिमन शाह वली, मौजे दाऊतपुर ता.भोकरदन जि.जालना या कब्रस्तानमध्ये मोकाट जनावरे येऊन कब्रींची नासधुस करतात. त्यामुळे सदरील कब्रस्तानला संरक्षण भिती बांधकामासाठी डॉ. वजाहत मिर्झा, विधान परिषद सदस्य, यवतमाळ यांनी स्थानिक विकास निधी सन.२०२१.२२ मधून रु.९.९८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात यावा यासाठी मा.जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन, यवतमाळ यांना दि.१२/८/२०२१ रोजी पत्र दिले असून कब्रस्तानला संरक्षण भिंती बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत खालील कागदपत्राची पुर्तता केली आहे. १)वक्फ संस्था नोंदणी आदेश, २)जोडपत्र व प्रमाणपत्र ३) शासन राजपत्र, ४)डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स. यांनी मा.जिल्हाधिकारी जिल्हा नियोजन, यवतमाळ यांना दिलेले पत्र, ५) ग्रामपंचायात प्रमाणपत्र ५)बांधकाम प्लॅन ईस्टीमेट, ६) प्रस्तावित जागाचे फोटो.

कब्रस्तान व चिल्ला चिमन शाह वली, मौजे दाऊतपुर ता.भोकरदन जि.जालना ची नोंद शासन राजपत्र दि.३०/८/१९७३ भाग-अ च्या अनुक्रमांक ७० वर असुन एकुण क्षेत्र २००x२०० आणि दिड एकर जमीनीची नोंद आहे. वक्फ संस्थेची चर्तुःसिमा पुर्वेस सार्वजनिक रस्ता, पश्चिमेस, सार्वजनिक रस्ता, दक्षिण, खेळना नदी, उत्तर, एकनाथ गजबा यांची शेती, आहे. सदरील वक्फ संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र.MSBW/JLN/३८/२००९ दि.१८/७/२००९ अन्वये रितसर नोंदणी करण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रकरणात जिल्हा वक्फ अधिकारी, जालना यांनी पत्र क्र.जिवअ/एसएनटी विभाग-८२/१९६/२०२१ दि.२९/९/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे. कब्रस्तान व चिल्ला चिमन शाह वली, मौजे दाऊतपुर ता.भोकरदन जि.जालना ही संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन वक्फ संस्थेस कोणीही मुतवल्ली किंवा व्यवस्थापन समिती मंजुर नाही. सदरील कब्रस्तानचे काम स्थानिक विकास निधीतून करण्यात येणार आहे. वक्फ संस्थेस व्यवस्थापन समिती मंजुर नसल्याने जिल्हा वक्फ अधिकारी, जालना यांच्या निगराणीत सदरील कब्रस्तानचे संरक्षण भिंती बांधकामाचे आदेश देण्याची विनंती जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार कब्रस्तान दाऊदपुराचे संरक्षण भिंतीचे बांधकाम जिल्हा वक्फ अधिकारी, जालना यांच्या निगराणीखाली करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. १५: -** **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन आदेश निर्गमित करावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. १६: -** **वक्फ संस्था मरहुम यासीन अहमद खान आणि मरहूम शेख बनुभाई दादाभाई जमादार कब्रस्तान वक्फ, मु.पो. बोरी बु. ता. जुन्नर जि. पुणे कब्रस्तान सपाटीकरण करण्यास नारहकत प्रमाणपत्र देणे बाबत.**

प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांनी १३/१०/२०२० व दि.९/७/२०२१ रोजी अहवाल सादर केला आहे, वक्फ संस्था मरहुम यासीन अहमद खान आणि मरहूम शेख बनुभाई दादाभाई जमादार कब्रस्तान वक्फ, मु.पो. बोरी बु. ता. जुन्नर जि. पुणे ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र. MSBW/PUN/४८४/२०१७ दि. २८/०९/२०१७ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. कब्रस्तानचे क्षेत्र २४०० चौ.मि. असुन कब्रस्तानची जागा एक लेवल मध्ये नसल्याकारणाने कब्रस्तानची व कबरींची दुरव्यवस्था झाली आहे त्याचे सपाटीकरण करणे आवश्यक आहे. सदर कब्रस्तान मध्ये अंतर्गत रस्ते व इतर सुविधा करणे आवश्यक असल्याने कब्रस्तानचे सपाटीकरण करण्यासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार शेख इकबाल अहमद जमादार व इतर रा. बोरी ता. जुन्नर जि. पुणे यांनी विनंती केली आहे.
वक्फ संस्थेस कोणतेही उत्पन्न नसल्याने वक्फ फंड निरंक आहे सोबत बॅलेन्सशिटची प्रत दिली आहे. कब्रस्तानचे देखरेख व व्यवस्था अर्जदार शेख इकबाल अहमद जमादार व इतर करीत आहे. कब्रस्तानचे सपाटीकरण करण्यासाठी रु.३९०००/- खर्च येणार असुन ते अर्जदार स्वत: व लोक वर्गणीद्वारे करणार आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत नोंदणी, आदेश, जोडपत्र, प्रमाणपत्र, कब्रस्तानचे फोटो, कामाचे कोटेशन, वक्फ संस्थेची बॅलेन्सशीटची प्रत दाखल केली आहे.
वर नमुद प्रकरणात प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांनी अहवाल देवून कब्रस्तान सपाटीकरण करण्याची परवानगी अर्जदारास देण्याची शिफारस केली आहे. परंतु सदरील वक्फ संस्थेस वक्फ मंडळातर्फे कोणतीही व्यवस्थापन समिती मंजुर नसल्याने प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांच्या निगराणीत कब्रस्तानचे सपाटीकरण करण्यास नरहकत प्रमाणपत्र देण्यासाठी सदर प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. १६: -** **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन आदेश निर्गमित करावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. १७: -** **दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा औरंगाबाद परीसरात बांधलेले गेस्ट हाऊसच्या वरच्या मजल्याचे बांधकामासाठी कर्ज मंजुर करण्याकरीता केंद्रीय वक्फ परिषदेकडे शिफारस व प्रस्ताव पाठविणे बाबत.**

**शहरी वक्फ संपत्ती विकास योजनाची थोडक्यात माहिती खालील प्रमाणे आहे.**

शहरी वक्फ संपत्ती विकास योजना ही योजना विविध कारणांमुळे देशातील बहुतांश औकाफकडे मर्यादित उत्पन्न आहे याचा परिणाम असा होते की, सामान्यत: मुतवल्लींना (औकाफचे व्यवस्थापक) ज्या हेतुंसाठी हे औकाफ तयार केले जातात किंवा हेतु आहेत पण ते पुरेसे करणे कठीण होते. बहुतेक शहरी वक्फ जमीनींमध्ये विकासाची क्षमता आहे परंतु मुतवल्ली आणि अगदी वक्फ बोर्डही या जमीनीवर आधुनिक कार्यात्मक इमारतींच्या बांधकामासाठी पुरेशी संसाधने गोळा करण्याच्या स्थितीत नाहीत.
औकाफ आणि वक्फ बोर्डाची आर्थीक स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या कल्याणकारी कार्याचे क्षेत्र वाढवण्याच्या दृष्टीने, रिक्त वक्फ जमीन अतिक्रमणापासून वाचवण्यासाठी आणि आर्थिकदृष्टया व्यवहार्य प्रकल्प विकसित करण्याच्या दृष्टीने ही योजना तयार करण्यात आली

आहे. या योजनेंतर्गत, विविध वक्फ बोर्डासाठी आणि देशातील वक्फ संस्थांना आर्थीकदृष्टया व्यवहार्य बांधकामासाठी बिनव्याजी कर्ज दिले जाते. वक्फ जमीनीवरील इमारती, जसे की व्यापारी संकुल, विवाह हॉल, रुग्णालये, शीतगृह इ.

केंद्रीया वक्फ परिषद (CWC) या योजनेची अंमलबजावणी करणारी एजन्सी आहे आणि ते CWC द्वारे मंजुर केलेल्या विशिष्ट विकास प्रकल्पांसाठी राज्य वक्फ बोर्ड/वक्फ संस्थांना शहरी भागात असलेल्या वक्फ मालमत्तेच्या विकासासाठी या योजनेअंतर्गत कर्ज प्रदान करते. शहरी क्षेत्र म्हणजे कोणत्याही क्षेत्रात वसलेली मालमत्ता, जी नगरपालिका हद्दीत समाविष्ट आहे (मग ती नगरपालिका, महानगरपालिका म्हणुन ओळखली जाते.अधिसुचित क्षेत्र समिती, टाऊन एरिया कमिटी किंवा इतर कोणत्याही नावाने) कॅन्टोन्मेंट बोर्ड आणि केंद्र किंवा राज्य सरकारच्या स्थानिक मर्यादांपासून ८ किलोमिटरपेक्षा जास्त नसलेल्या अशा अंतरातील क्षेत्राचा विकास करण्यासाठी बिनव्याजी कर्ज सहाय्य देतात या प्रकल्पांमध्ये आर्थीक दृष्टया व्यवहार्य इमारतींचे बांधकाम किंवा पुनर्बांधणी किंवा वक्फ जमीनीवरील प्रकल्पांचा समोश आहे. वाढील उत्पन्नाचा उपयोग राज्य वक्फ बोर्ड/वक्फ संस्थांद्वारे त्यांची आर्थीक स्थिती मजबुत करण्यासाठी आणि त्यांच्या कल्याण आणि धर्मदाय उपक्रमांची व्याप्ती वाढवण्यासाठी केला जाईल. संपुर्ण उद्देश समाजाच्या सर्वांगीण प्रगती आणि विकासात योगदान देण्याचा आहे.

श्री. जावेद खान पटेल, अध्यक्ष व्यवस्थापन कमेटी दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा औरंगाबाद यांनी दि.८/७/२०२१ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी च्या परिसरात शादीखाना व गेस्ट हाऊस वक्फ संस्थेने स्वत:च्या खर्चाने बांधलेला आहे. पांचखानी जवळ बांधलेल्या गेस्ट हाऊसचे एकुण क्षेत्र ४३०४.४१ चौ.फुट असुन त्याच्यावर एक मजला बांधण्याचे वक्फ संस्थेने ठरविले आहे. प्रस्तावित बांधकामासाठी लागणारा खर्च रक्कम रु.३९,५३,२००/- इतका असुन केंद्रीय वक्फ परिषद, न्यु दिल्ली यांच्याकडून कर्ज (लोन) मंजुर करण्यासाठी या कार्यालयाचे शिफारसीसह प्रस्ताव पाठविण्याची विनंती केली आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत बांधकाम प्लॅन इस्टीमेट प्रोजेक्ट रिपोर्ट त्यामध्ये कर्जाची परतफेळ कशा प्रकारे केली जाईल याचा तक्ता, नोंदणी आदेश, प्रमाणपत्र, वक्फ संस्थेचे प्रशासनासाठी मंजुर योजनाची प्रत दाखल केली आहे.

दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी व दर्गाह शमशोद्दिन मस्जीद व खानखा, समाखाना, व कब्रस्तान, उस्मानपुरा औरंगाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र.MSBW/ABD/९९/२००८ दि.३१/१२/२००८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. वक्फ संस्थेची मालमत्ता न.भु.क्र.१६३१२ एकुण क्षेत्र २१११.७ चौ.मि. मुळ धारक मराठवाडा वक्फ बोर्ड, औरंगाबाद, मालमत्ता न.भु.क्र.१६३१३ एकुण क्षेत्र २०६०४.०६ चौ.मि. मुळ धारक मराठवाडा वक्फ बोर्ड, औरंगाबाद तसेच सर्वे नं. ३४ एकुण क्षेत्र २ हेक्टर ४५ आर ची नोंद आहे परंतु ७/१२ उता-यावर हा ७/१२ बंद झाला आहे अशी नोंद आहे.

सदरील वक्फ संस्थाचे व्यवस्थापन आर्थीक बाबी व दर्गाहच्या संबंधित असलेल्या वक्फ मिळकती संबंधी व्यवस्थापन समिती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या सरळ निगराणीत राहिल या बाबतचे सर्व निर्णय वक्फ मंडळ घेईल त्यात व्यवस्थापन समितीस कोणताही हस्तक्षेप करता येणार नाही किंवा बँकेत खाते उघडते येणार नाही या शिवाय आर्थीक बाबी मध्ये निर्णय घेता येणार नाही असे निर्णय दि.२६/२/२०१३ रोजी केस क्र.३२/२७५/२०१२ मध्ये झालेले आहे. फक्त वक्फ संस्थेचे व्यवस्थापनात मदत करण्यासाठी योजनेस दि.२६/२/२०१३ च्या निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी पत्र क्र.मरावमं/संकिर्ण विभाग/३१/२०२१/३१२ दि.१७/९/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे त्यामध्ये वर नमुद गेस्ट हाऊसच्या वरचा मजला त्यामध्ये एकुण १४ रुम बांधण्याचे प्रस्ताव केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविणे बाबत शिफारस केली आहे.

शहरी वक्फ संपत्ती विकास योजना अंतर्गत पुर्वी बांधलेले गेस्ट हाऊसच्या वरचा मजला बांधणेकरिता कर्ज मंजुर करण्यासाठी बांधकाम प्लॅन महानगरपालिकाद्वारे मंजुर असणे आवश्यक आहे. सदरील बांधकामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र दिल्यास महानगरपालिकाकडून

बांधकाम प्लॅन मंजुर करुन सदर प्रस्ताव केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविता येईल.

सदरील बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत व केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक आहे. सदरील प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. १७: - **सदर बांधकामाच्या आराखड्यास महानगर पालिका, औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून सदर बांधकामासाठी वक्फ मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे तसेच सदरचा प्रस्ताव वक्फ मंडळामार्फत केंद्रिय वक्फ परिषद नवी दिल्ली यांना पाठविण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. १८: - दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा औरंगाबाद परीसरात बॉईज हॉस्टेल बांधण्यासाठी कर्ज मंजुर करण्याकरीता केंद्रीय वक्फ परिषदेकडे शिफारस व प्रस्ताव पाठविणे बावत.**

श्री. जावेद खान पटेल, अध्यक्ष व्यवस्थापन कमेटी दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा औरंगाबाद यांनी दि.८/७/२०२१ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी च्या परिसरात बॉईज हॉस्टेल बांधण्याचे वक्फ संस्थेने ठरविले आहे. त्यांनी अर्जात नमुद केले की शहरात अनेक कॉलेजेस व टेक्निकल इन्स्टिटयूट असून मुस्लीम मुलांना शिक्षण घेण्यासाठी व राहण्यासाठी फार अडचन येतात त्यामुळे मुस्लीम विद्यार्थी शहरा मध्ये लॉज मध्ये राहतात. त्यांची गैरसोय दुरु करण्यासाठी दर्गाह परिसरातील (गडबडे पीर दर्गाह हजरत शाहनुर हमवी परिसर कमान जवळ) मुस्लीम हॉस्टेल बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन एकुण क्षेत्र ११०१०.१५ चौ.फुट जागा मध्ये वक्फ संस्थेच्या वतीने मुस्लीम बॉईज हॉस्टेल बांधण्याचे ठरविले आहे. प्रस्तावित बॉईज हॉस्टेल बांधकामासाठी लागणारा खर्च रक्कम रु.१,१३,६३,३३०/- (रु.एक कोटी तेरा लाख त्रेसठ हजार तीनशे तीस) इतका असुन केंद्रीय वक्फ परिषद, न्यु दिल्ली यांच्याकडून कर्ज (लोन) मंजुर करण्यासाठी या कार्यालयाचे शिफारसीसह प्रस्ताव पाठविण्याची विनंती केली आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत बांधकाम प्लॅन इस्टीमेट प्रोजेक्ट रिपोर्ट त्यामध्ये कर्जाची परतफेळ कशा प्रकारे केली जाईल याचा तक्ता, नोंदणी आदेश, प्रमाणपत्र, वक्फ संस्थेचे प्रशासनासाठी मंजुर योजनाची प्रत दाखल केली आहे.

दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी व दर्गाह शमशोद्दिन मस्जीद व खानखा, समाखाना, व कब्रस्तान, उस्मानपुरा औरंगाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र.MSBW/ABD/९९/२००८ दि.३१/१२/२००८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. वक्फ संस्थेची मालमत्ता न.भु.क्र.१६३१२ एकुण क्षेत्र २१११.७ चौ.मि. मुळ धारक मराठवाडा वक्फ बोर्ड, औरंगाबाद, मालमत्ता न.भु.क्र.१६३१३ एकुण क्षेत्र २०६०४.०६ चौ.मि. मुळ धारक मराठवाडा वक्फ बोर्ड, औरंगाबाद तसेच सर्वे नं. ३४ एकुण क्षेत्र २ हेक्टर ४५ आर ची नोंद आहे परंतु ७/१२ उता-यावर हा ७/१२ बंद झाला आहे अशी नोंद आहे.

सदरील वक्फ संस्थाचे व्यवस्थापन आर्थीक बाबी व दर्गाहच्या संबंधित असलेल्या वक्फ मिळकती संबंधी व्यवस्थापन समिती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या सरळ निगराणीत राहिल या बाबतचे सर्व निर्णय वक्फ मंडळ घेईल त्यात व्यवस्थापन समितीस कोणताही हस्तक्षेप करता येणार नाही किंवा बँकेत खाते उघडते येणार नाही या शिवाय आर्थीक बाबी मध्ये निर्णय घेता येणार नाही असे निर्णय दि.२६/२/२०१३ रोजी केस क्र.३२/२७५/२०१२ मध्ये झालेले आहे. फक्त वक्फ संस्थेचे व्यवस्थापनात मदत करण्यासाठी योजनेस दि.२६/२/२०१३ च्या निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी पत्र क्र.मरावमं/संकिर्ण विभाग/२९/२०२१/३१० दि.१७/९/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे त्यामध्ये वर नमुद मुस्लीम बॉईज हॉस्टेल बांधण्याचे प्रस्ताव केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविणे बाबत शिफारस केली आहे.

शहरी वक्फ संपत्ती विकास योजना अंतर्गत मुस्लीम बॉईज हॉस्टेल बांधणेकरिता कर्ज मंजुर करण्यासाठी बांधकाम प्लॅन महानगरपालिकाद्वारे मंजुर असणे आवश्यक आहे. सदरील बांधकामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र दिल्यास महानगरपालिकाकडून बांधकाम प्लॅन मंजुर करुन सदर प्रस्ताव केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविता येईल.

सदरील बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत व केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक आहे. सदरील प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. १८: -** **सदर बांधकामाच्या आराखड्यास महानगर पालिका, औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून सदर बांधकामासाठी वक्फ मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे तसेच सदरचा प्रस्ताव वक्फ मंडळामार्फत केंद्रिय वक्फ परिषद नवी दिल्ली यांना पाठविण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. १९: -** **दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा औरंगाबाद परीसरात महिलांसाठी फंक्शन हॉल बांधण्यासाठी कर्ज मंजुर करण्याकरीता केंद्रीय वक्फ परिषदेकडे शिफारस व प्रस्ताव पाठविणे बाबत.**

श्री. जावेद खान पटेल, अध्यक्ष व्यवस्थापन कमेटी दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी रहे, उस्मानपुरा औरंगाबाद यांनी दि.८/७/२०२१ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी च्या परिसरात चमन जवळ महिलांसाठी फंक्शन हॉल बांधण्याचे वक्फ संस्थेने ठरविले आहे. दर्गाह परिसरातील क्षेत्र १२६२.८१ चौ.फुट मध्ये प्रस्तावीत बांधकाम करण्यात येणार आहे बांधकामासाठी लागणारा खर्च रक्कम रु.८८,६६,२३०/- (रु. अठ्ठयासी लाख छेसट हजार दोनशे तीस) इतका असुन केंद्रीय वक्फ परिषद, न्यु दिल्ली यांच्याकडून कर्ज (लोन) मंजुर करण्यासाठी या कार्यालयाचे शिफारसीसह प्रस्ताव पाठविण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे. अर्जासोबत बांधकाम प्लॅन इस्टीमेट प्रोजेक्ट रिपोर्ट त्यामध्ये कर्जाची परतफेळ कशा प्रकारे केली जाईल याचा तक्ता, नोंदणी आदेश, प्रमाणपत्र, वक्फ संस्थेचे प्रशासनासाठी मंजुर योजनाची प्रत अर्जदार यांनी दाखल केली आहे.

दर्गाह हजरत सय्यद शाहनुर हमवी व दर्गाह शमशोद्दिन मस्जीद व खानखा, समाखाना, व कब्रस्तान, उस्मानपुरा औरंगाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र.MSBW/ABD/९९/२००८ दि.३१/१२/२००८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. वक्फ संस्थेची मालमत्ता न.भु.क्र.१६३१२ एकुण क्षेत्र २१११.७ चौ.मि. मुळ धारक मराठवाडा वक्फ बोर्ड, औरंगाबाद, मालमत्ता न.भु.क्र.१६३१३ एकुण क्षेत्र २०६०४.०६ चौ.मि. मुळ धारक मराठवाडा वक्फ बोर्ड, औरंगाबाद तसेच सर्वे नं. ३४ एकुण क्षेत्र २ हेक्टर ४५ आर ची नोंद आहे परंतु ७/१२ उता-यावर हा ७/१२ बंद झाला आहे अशी नोंद आहे.

सदरील वक्फ संस्थाचे व्यवस्थापन आर्थीक बाबी व दर्गाहच्या संबंधित असलेल्या वक्फ मिळकती संबंधी व्यवस्थापन समिती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या सरळ निगराणीत राहिल या बाबतचे सर्व निर्णय वक्फ मंडळ घेईल त्यात व्यवस्थापन समितीस कोणताही हस्तक्षेप करता येणार नाही किंवा बँकेत खाते उघडते येणार नाही या शिवाय आर्थीक बाबी मध्ये निर्णय घेता येणार नाही असे निर्णय दि.२६/२/२०१३ रोजी केस क्र.३२/२७५/२०१२ मध्ये झालेले आहे. फक्त वक्फ संस्थेचे व्यवस्थापनात मदत करण्यासाठी योजनेस दि.२६/२/२०१३ च्या निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांनी पत्र क्र.मरावमं/संकिर्ण विभाग/३०/२०२१/३११ दि.१७/९/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे त्यामध्ये वर नमुद महिलांसाठी फंकशन हॉल बांधण्याचे प्रस्ताव केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविणे बाबत शिफारस केली आहे.

शहरी वक्फ संपत्ती विकास योजना अंतर्गत महिलांसाठी फंक्शन हॉल बांधणेकरिता कर्ज मंजुर करण्यासाठी बांधकाम प्लॅन महानगरपालिकाद्वारे मंजुर असणे आवश्यक आहे. सदरील बांधकामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र दिल्यास महानगरपालिकाकडून बांधकाम प्लॅन मंजुर करुन सदर प्रस्ताव केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविता येईल.

सदरील बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत व केंद्रीय वक्फ परिषद, न्यू दिल्ली यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक आहे. सदरील प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. १९: - सदर बांधकामाच्या आराखड्यास महानगर पालिका, औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून सदर बांधकामासाठी वक्फ मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे तसेच सदरचा प्रस्ताव वक्फ मंडळामार्फत केंद्रिय वक्फ परिषद नवी दिल्ली यांना पाठविण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. २०: - नवाब अयाज अली खान ट्रस्ट, २४६ इब्राहीम रहिमतुल्लाह रोड, मुंबई चे किरकोळ दुरुस्ती आणि वजुखाना परिसरात लोखंडी गार्डर लावण्यासाठी नारहकत प्रमाणपत्र देणे बाबत.**

श्री. मुफीज नवांगे, ट्रस्टी, नवाब अयाज अली खान ट्रस्ट, २४६ इब्राहीम रहिमतुल्लाह रोड, मुंबई-०३ यांनी दि.१/९/२०२१ रोजी अर्ज दिला आहे त्यामध्ये नवाब अयाज मस्जीद ट्रस्ट, मुंबई ही संस्था वक्फ मंडळात क्र.MSBW/MUM/२९६/२०१३ अन्वये नोंदणीकृत आहे. मुसळधार पावसामुळे मस्जीदचे किरकोळ दुरुस्ती काम करणे आवश्यक्ता आहे तसेच वजुखाना क्षेत्राचे टिनशेड खराब झाले असून त्यामुळे लोकांवर वरील टिनशेड खाली पडण्याची शक्यता असल्याने वजुखाना परिसरात लोखंडी गार्डर लावायचे आहे. अर्जदार यांनी मस्जीदचे फोटो दिले असून सदर मस्जीदचे दुरुस्ती कामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस विनंती केली आहे.

सदर मस्जीदचे दुरुस्ती बांधकाम तसेच वजुखाना परिसरात लोखंडी गार्डर लावणे आवश्यक असल्याने सदरील प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. २०:- मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करुन आदेश निर्गमित करावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. २१: - समस्त मुलाणी मस्जीद, कडूस ता. खेड जि.पुणेच्या संबंधीत मौजे कडूस येथील वक्फ मिळकत गट क्र.३८५७, ३८५९, ३८६६, ३८७०, ३८६९, ३८७४, ३८७५, ३६९२, ३६९४, ३६९५, ३६९६, ३६९७, ३७०३, या मिळकतीवरील पब्लीक सेमी पब्लीक/शासकिय निमशासकिय प्रकल्पासाठी टाकलेले आरक्षण रद्द करणे बाबत.**

श्रीं.इब्राहीम नुरमहंमद मुलाणी, समस्त मुलाणी मस्जीद, कडूस ता. खेड जि.पुणे यांनी दि.२७/८/२०२१ रोजी अर्ज देवून समस्त मुलाणी मस्जीद, कडूस ता.खेड जि.पुणे च्या संबंधीत मौजे कडूस येथील वक्फ मिळकत गट क्र.३८५७, ३८५९, ३८६६, ३८७०, ३८६९, ३८७४, ३८७५, ३६९२, ३६९४, ३६९५, ३६९६, ३६९७, ३७०३, या मिळकतीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी विकास योजनेचे दि.२/८/२०२१ रोजी प्रसिध्द झालेल्या प्रस्तावित

नकाशानुसार पब्लीक सेमी पब्लीक/शासकिय निमशासकिय प्रकल्पासाठी आरक्षण टाकण्यात आले बाबत या कार्यालयाचे निदर्शनास आणुन दिले आहे.

समस्त मुलाणी मस्जीद, कडूस ता.खेड जि.पुणे ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र.MSBW/PUN/८७/२००९ दि. १८/११/२००८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था असुन उपरोक्त गट क्रमांकाच्या मिळकती या वक्फ संस्थेच्या मिळकती आहेत. वक्फ संस्था त्या जमीनीमध्ये शेती करुन त्यामधून मिळणा-या उत्पन्नातून मस्जीदची दिवाबत्ती, सार्वजनिक उत्सव तसेच देखभाल व मौलानाना वेतन देतात. सदरील वक्फ मिळकतीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आरक्षण टाकल्यामुळे मुस्लीम समुदायामध्ये असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे व वक्फ मिळकतीचे अतोनात नुकसान होणार आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३ (आर ) नुसार वक्फ मिळकत हे नेहमी वक्फ राहते त्यात बदल करता येत नाही. एखादी वक्फ मालमत्ता सार्वजनिक उपक्रमासाठी शासनास संपादित करावयाची असल्यास वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ९१ नुसार वक्फ मंडळाची नाहरकत घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रकरणात वक्फ मंडळास कोणतीही पुर्व सुचना न देता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वक्फ मिळकतीवर प्रस्तावित नकाशानुसार पब्लीक सेमी पब्लीक/शासकिय निमशासकिय प्रकल्पासाठी टाकलेले आरक्षण रद्द करणे बाबत मा. आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण महाराजा सयाजी गायकवाड, उद्योग भवन, वार्ड क्र.८, सर्वे नं. १५२-१५३, औंधगांव, औंध पुणे यांना दि.०१/१०/२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर बाब वक्फ मंडळाच्या अवलोकनासाठी सादर करण्यात येत आहे. या बाबत वक्फ मंडळाच्या सदस्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे व्यक्तीश: पाठपुरावा करावा यासाठी सदर विषय वक्फ मंडळाच्या समोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. २१:-** **सदर वक्फ मालमत्तेवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांने वक्फ मंडळास कोणतीही पुर्व सुचना न देता टाकलेले आरक्षण उठविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. २२: -** **हजरत सय्यद सातपीर दर्गाह शरीफ ट्रस्ट, अर्वी पिंपळगांव ता.जुन्नर जि.पुणे वक्फ मिळकत मौजे अर्वी गट नंबर २१०/१ ते २१०/११ एकुण ७ हेक्टर २० आर जमीनीचा भुसंपादन मोबदला मिळणे बाबत.**

हजरत सय्यद सातपीर दर्गाह शरीफ ट्रस्ट, अर्वी पिंपळगांव ता.जुन्नर जि.पुणे (बी-२९८) ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ नुसार क्र. MSBW/PUN/३९/२००७ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे वक्फ संस्थेची मिळकत क्षेत्र २८ हेक्टर ४६ आर ची नोंद वक्फ संस्थेच्या परिशिष्ट.१ मध्ये घेण्यात आलेली आहे. वक्फ मिळकत गट नंबर २१०/१ ते २१०/११ एकुण ७ हेक्टर २० आर जमीन सन १९६७ मध्ये विदेश संचार निगम लिमिटेड, भारत सरकार यांनी त्यांचे आदेश दि.३१/१०/१९६७ अन्वये संपादीत केली आहे. त्यानंतर भारत सरकारने सन २००८ मध्ये विदेश संचार निगम लिमिटेडचे नांव बदलून टाटा कम्युनिकेशन करण्यात आले.

हजरत सय्यद सातपीर दर्गाह शरीफ ट्रस्ट, अर्वी ता.जुन्नर जि.पुणे या वक्फ संस्थेचे विश्वस्त श्री. फकीर महंमद बाबमियाँ मोमीन यांनी उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग खेड यांच्याकडे भुसंपादन जमीनीचा मोबदला मिळणेसाठी अर्ज दिला होता. उपविभागीय अधिकारी जुन्नर उपविभाग खेड (पुणे) यांनी दि.२१/०२/२००५ रोजी उत्तर दिले की, मौजे आर्वी ता.जुन्नर जि.पुणे येथील जमीन उपग्रह दळणवळण केंद्राकरीता त्यांच्याकडील क्र.एलएक्यु/केस/१/१९६६ दि.३१/१०/१९६७ अन्वये संपादन करण्यात आल्या आहेत. संपादीत जमीनीची नुकसान भरपाई अदा करणे करीता त्यांच्या कडील क्र.संपादन/वशी/१९६७ दि.१२/१२/१९६७ अन्वये तहसीलदार जुन्नर यांचेकडे फायनल आवार्ड पाठविण्यात आलेले आहे संपादीत झालेल्या जमीनीचे नुकसान भरपाईकामी तहसीलदार जुन्नर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

उपरोक्त प्रकरणांत भुसंपादनाची रक्कमे बाबत मा. मंत्री अल्पसंख्याक विकास व औकाफ यांचे दालनात दि.२३/०२/२०२१ रोजी बैठक झाली आहे त्या बैठकीतील इतिवृत्तानुसार या कार्यालयास प्राप्त झालेल्या निर्देशावरुन भुसंपादन रक्कम वक्फ मंडळात जमा करणे बाबत प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांच्यातर्फे दि.२५/०५/२०२१ रोजी उपजिल्हाधिकारी, भुसंपादन क्र.१३ पुणे यांना पत्र देण्यात आले आहे त्यावर कोणतीही खातर जमा करण्यात आली नाही. तसेच दि.८/०६/२०२१ रोजी व्यवस्थापक, टाटा कम्युनिकेशन कार्यालय, दिघी, आळंदी रोड पुणे यांना पत्र देण्यात आले आहे परंतु त्यावरही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

दि. १/१/१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असून महाराष्ट्रातील वक्फ संस्थांचे व्यवस्थापन व त्याचे वक्फ मालमत्तांचे संरक्षणाची जवाबदारी तसेच मुतवल्ली/विश्वस्तांचे कामकाजावर देखरेख करण्यांसाठी अधिनियमानुसार या कायद्याने महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास अधिकार दिलेले आहे. वर नमुद भुसंपादनाची रक्कम वक्फ मंडळाकडे वर्ग करण्यांत आलेली नसल्याने वक्फाचे आर्थिक नुकसान होत आहे.

वर नमुद प्रकरणांत विदेश संचार निगम लिमिटेड, भारत सरकार यांनी त्यांचे आदेश दि.३१/१०/१९६७ अन्वये संपादीत केलेली मोजे आर्वी येथील गट नंबर २१०/१ ते २१०/११ एकुण ७ हेक्टर २० आर जमीनीचा भुसंपादन मोबदला आजच्या बाजार मुल्यांकन प्रमाणे मोबदला रक्कमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नावाने या कार्यालयास पाठविणे बाबत १) सक्षम प्राधिकारी, तथा उपजिल्हाधिकारी (भुसंपदान) क्र.१३, पुणे २) व्यवस्थापक टाटा कम्युनिकेशन, दिघी, आळंदी रोड, पुणे यांना पत्र देण्यात आले आहे. सदर प्रकरणांत भुसंपादन मोबदला मिळणेसाठी वक्फ मंडळाच्या विधी विभागामार्फत कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर प्रकरण वक्फ मंडळाच्या अवलोकनासाठी सादर करण्यात येत आहे. या बाबत वक्फ मंडळाच्या सदस्यंनी संबंधित १) उपजिल्हाधिकारी (भुसंपदान) क्र.१३, पुणे २) व्यवस्थापक टाटा कम्युनिकेशन, दिघी, आळंदी रोड, पुणे यांना व्यक्तीश: पाठपुरावा करावा यासाठी सदर विषय वक्फ मंडळाच्या समोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. २२:-** **सदर वक्फ संस्थेच्या संपादीत करण्यात आलेल्या ७ हेक्टर २० आर इतक्या वक्फ जमिनीचा भुसंपादन मोबदला किती मंजूर करण्यात आला या बाबत संबंधीत तहसिलदार, उप-विभागीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र. १३ पुणे यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे या अधिका-यांकडुन सांगण्यात येते. तरी सदर वक्फ जमीनीचा भुसंपादन मोबदला प्राप्त होण्याच्या दृष्टीने संबंधीत वक्फ संस्थेने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी व त्यात वक्फ मंडळाला एक पक्ष म्हणून समाविष्ट करावे, अशा सूचना सदर वक्फ संस्थेला देण्यात याव्यात, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्रमांक. २३:- दर्गा सय्यद शाह तुराबुल हक्क परभणी च्या संबंधित इनाम जमीन सर्वे नं. ५९१ पैकी ६०x१०० (६००० चौ.फुट) जागा शाळा चालविण्यासाठी भाडेपट्टयावर मिळणे बाबत.**

जिल्हा वक्फ अधिकारी, परभणी यांनी पत्र क्र.वक्फ/परभणी/१२९/२०२० दि. २९/०९/२०२० अन्वये अहवाल सादर केले आहे की, दर्गा सय्यद शाह तुराबुल हक्क परभणी हे वक्फ मालमत्ता असून याची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २/५/१९७४ भाग-क च्या अनुक्रमांक ३ वर नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. अर्जदार सचिव महाराष्ट्र उर्दू एज्युकेशन सोसायटी, परभणी यांनी वरील वक्फ संस्थेचे सर्वे नं.५९१ मधील ६०x१०० फुट (६००० चौ.फुट) मोकळी जागा मध्ये स्थानिक अल्पसंख्याक समाजातील गोरगरीब लोकांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी शाळा उघडण्याकरीता जागा भाडेवर मिळणेस विनंती केली आहे. सदरील जागा खुली असुन आजपर्यंत कोणाला ही भाडेवर देण्यात आलेली नाही सर्वे नं. ५९१ क्षेत्रफळ ९ एकर ०३ गुंठे पैकी ६०x१०० (६००० चौ.फुट) जागा नविन मुल्यांकन नुसार सचिव महाराष्ट्र ऊर्दु एज्युकेशन सोसायटी, परभणी यांना कार्यालय स्तरावर निर्णय घेऊन जागा भाडेवर देणे बाबत जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी शिफारश केली आहे. परंतु

परभणी जिल्हयाचे वार्षीक मुल्यदर तक्ते सन २०२०-२१ प्रमाणे सर्वे नं ५९१ पैकी मिळकतीचे खुली जमीनचे दर प्रति चौरस मिटर रुपये १९०० आहे त्यानुसार एकुण क्षेत्र ६००० चौ.फुट (५५७.४१ चौ.मि) जागाचे वार्षीक भाडे रुपये १०५९१/- रुपये होतात. आणि मासिक भाडे रुपये ८८३/- रुपये होतात सदरील भाडेची रक्कम अत्यंत अल्प आहे.

दर्गाह हजरत सय्यद शाह तुराबुल हक्क साहब रहे, परभणी दर्गाचा उर्स मोठया प्रमाणात साजरा केला जातो. सदर दर्गाह पासून वक्फ मंडळास मोठयाप्रमाणात उत्पन्न प्राप्त होते उर्सच्या १५ दिवसाच्या कालावधीत सुमारे २००० दुकाने, हॉटेल, झुले व हात गाडी सदरील खुली जमीनीमध्ये लावण्यात येतात. सदरील जागा भाडण्याने दिल्यास दर्गाहच्या उर्स काळात अडचण निर्माण होवू शकते व इतर लोकही जागा भाडेवर मिळण्यासाठी अर्ज करु शकतात. त्यामुळे भविष्यात उर्सच्या कार्यक्रमासाठी जागा कमी पडू नये या बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

वर नमुद प्रकरणात भाडेकरार करणे किंवा कसे या बाबत सदर विषय वक्फ मंडळा समोर सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. २३:- **प्रचलित निकषांनुसार नवीन शाळा सुरु करण्यासाठी किमान १ एकर जागा आवश्यक असते. तथापि या प्रस्तावात केवळ ६००० चौ. फु. इतकी जागा उपलब्ध असल्याने सदर प्रस्ताव विहित निकषांस अनुसरुन नाही. सबब सदरचा प्रस्ताव एकमताने अमान्य करण्यात आला.**

विषय क्रमांक. २४:- **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील कार्यालयात रिक्त असलेली लिपिक-टंकलेखक संवर्गाची १६ पदे भरणेबाबत लिपीक या पदावर भर्ती करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्यालयात संपुर्ण महाराष्ट्रातील वक्फ संस्थांची कामे प्रगतिपथावर असून वरचेवर कर्मचारी वयोमानाने सेवा निवृत्त होत आहे. सध्या वक्फ मंडळात ७ जिल्हा वक्फ कार्यालये तसेच ५ प्रादेशिक वक्फ कार्यालये व मुख्यालय येथे एकुण फक्त १६ लिपीक-टंकलेखक कार्यरत आहेत. कर्मचा-यांची कमतरतामुळे वक्फ मंडळाचे दैनंदिन कामकाज करणे अडचणीचे झालेले आहे. वक्फ संस्थांचे नोंदणी, बदल अर्ज, योजना मंजुरी, इ. प्रकरणे फार मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहे.

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र दिनांक १७.०६.२०११ अन्वये वक्फ मंडळाच्या आस्थापनेवरील १०६ पदांना मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्यात एकुण ३२ लिपीक-टंकलेखक संवर्गाच्या पदांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

वक्फ मंडळाच्या पुर्नरचनेअंतर्गत एकुण २१६ पदांचा सुधारित प्रस्ताव शासनास या कार्यालयाचे पत्र क्र. १७०/अ/२०२१ दिनांक ११.०१.२०२१ रोजी सादर करण्यात आला असून त्यास मंजुरी मिळण्यास आणखी कालावधी लागण्याची शक्याता आहे. या प्रस्तावामध्ये लिपिक-टंकलेखकाची ७१ पदे प्रस्तावित करण्यात आली आहेत. सध्या वक्फ मंडळासाठी मंजूर असलेल्या १०६ पदांच्या आकृतिबंधानुसार ३२ मंजूर लिपिकांची पदे आहेत. या आकृतीबंधानुसार केवळ लिपिक-टंकलेखक पदांचा विचार करता १६ पदांवर वक्फ मंडळामध्ये कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरित १६ पदांवर नियमित भरती करता येवू शकेल.

यासाठी शासनाच्या पदांच्या आरक्षणाबाबतच्या विविध सुचना विचारात घेवून १६ लिपिक-टंकलेखक पदांची भरती करता येईल. लिपिक-टंकलेखकाची १६ पदे भरण्यास वक्फ मंडळाची मान्यता घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

शासनाने ठरविलेल्या कार्यपध्दती व निकषानुसार सदर पदभरती करण्यात येईल.

ठराव क्रमांक. २४:- **सदर प्रकरणी संबंधीत कायदेशीर तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. या बाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३ महिन्याच्या कालावधीत वक्फ मंडळापुढे सादर करण्यात यावा.**

# मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय

**विषय क्र. २५:-** **दर्गाह हजरत दाऊद औलीया मगरीबी मोंढा नाका, ही वक्फ संस्था व त्या संस्थेची मालमत्ता वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत.**

**दर्गाह** हजरत दाऊद औलीया मगरीबी मोंढा नाका भवानीनगर औरंगाबाद ही वक्फ़ संस्था महाराष्ट्र शासन राजपत्र औरंगाबाद पार्ट सी. चे अनुक्रमांक ३६, दि. १७/०५/१९७३ पान क्र. १८ व १९ वर नोंदणीकृत असुन या वक्फ़ संस्थेची संबंधीत वक्फ़ मिळकत सर्वे नं. ३३ वक्फ़ संस्थेची मालमत्ता आहे.

सदर संस्थाच्या मालकीची औरंगाबाद शहरातील सि.टी.एस. नं. १२५०३ मधिल ४४१८.३१ चौ.मी. वक्फ़ जमीनी प्रकरणी तात्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळ औरंगाबाद व दिलीप चितलांगे आणि कुलभुषण अग्रवाल यांच्या दरम्यान न्यायालय बाहेर दि. २१/१०/२०१६, रोजी भाडेपट्टा करार करण्यात आला. वक्फ़ अधिनियम १९९५ मधिल कलम ३२ (२) (J) व कलम ५६ मधील तरतुदीचे उल्लघन करुन तसेच The Maharashatra Wakf Rules, २००३ च्या नियम २५ व २६ अन्वये विहीत करण्यात आलेल्या कार्य पध्दतीचे अनुपालन न करता करण्यात आला आहे. यासाठी तात्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळ औरंगाबाद सक्षम नसताना व त्यांना कोणताही अधिकार प्राप्त नसताना करण्यात आलेला आहे. सदर भाडे करार महाराष्ट्र वक्फ़ न्यायाधिकरणाने बेकायदा घोषीत कलेला आहे.

वक्फ मंडळाकडुन सदर वक्फ संस्थेवर सद्यःस्थितीत कोणाचीही मुतवल्ली पदावर नियुक्ती करण्यात आलेली नाही.

वक्फ़ न्यायाधिकरणाचा निर्णय मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी कायम ठेवला आहे. शासनाने वक्फ़ अधिनियम १९९५ च्या कलम ९७ अन्वये वक्फ़ मंडळास निर्देश दिले आहेत की, सदर संस्थाचे मुतवल्ली हे निष्क्रीय व मालमत्ता रक्षण करण्यास असमर्थ असल्याने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६४ मधील तरतुदीनुसार त्यांना मुतवल्ली पदावरुन हटविण्याच्या तसेच हटवुन वक्फ़ अधिनियम १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार सदर संस्था रास्त वक्फ़ मंडळाच्या ताब्यात घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावी.

वर नमुद दर्गाह हजरत दाऊद औलीया मगरीबी ता.जि.औरंगाबाद ही वक्फ़ संस्था व त्याची सर्व मालमत्ता वक्फ़ अधिनियम १९९५ चे कलम ६५ अन्वये सदर वक्फ़ संस्था वक्फ़ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत सदर विषय वक्फ़ मंडाळाच्या समोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. २५:-** **दर्गाह हजरत दाऊद औलीया मगरीबी मोंढा नाका, ही वक्फ संस्था व त्या संस्थेची मालमत्ता वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेण्याचा ठराव उपस्थित १० सदस्यांच्या ९ विरुध्द १ अशा बहुमताने मंजूर करण्यात आला. सदर संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत घेण्यात आल्यास त्याचा फायदा दिलीप चितलांगे व कुलभूषण अग्रवाल या अनधिकृत ताबा धारकांना होईल, असे नमुद करुन सन्माननीय सदस्य ॲड.श्री.खालीद बाबू कुरेशी यांनी ठरावाच्या विरोधी मतदान केले.** कार्यवाही पूर्ण झाल्यावर कलम ५४ नुसार कार्यवाही करण्यात यावी असा ठराव ॲड.खा.बा.कुरेशी यांनी प्रस्तावित केला व तो एकमताने मंजूर करण्यात आला.

**यावेळी झालेल्या चर्चेत, जालना रोड औरंगाबाद या रस्त्यावर नेमक्या किती वक्फ मालमत्ता आहेत या बाबतचा नेमका तपशील (सर्वे नं, मालमत्तांचे क्षेत्रफळ, कोणाच्या ताब्यात आहेत, अतिक्रमण अस्तित्वात असल्यास ते किती व कोणाचे आहे या बाबतच्या तपशिलासह) वक्फ मंडळाच्या पुढील बैठकी समोर ठेवण्यात यावा, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र. २६:- जामा मस्जिद व कब्रस्तान, बुढ्ढीलेन, औरंगाबाद ही वक्फ संस्था व या संस्थेची वक्फ मालमत्ता सर्वे नं. २१० मधील आमखास मैदानाची, २९ एकर ०९ गुंठे या मालमत्तेसह इतर सर्व मालमत्ता**

**वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडाळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत.**

वक्फ़ संस्था जामा मस्जिद कब्रस्थान, आमखास मैदान ही वक्फ़ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये वक्फ़ मंडाळात नोंदणीकृत असुन याचा नोंदणी क्र.मरावम/औ.बाद/५२६/२०१३, दि. २६/०६/२०१३ असा आहे. सदर संस्थाचे सर्वे नं. २१० क्षेत्र २९ एकर ०९ गुंठे असुन या मध्ये आमखास ग्राऊन्ड चा समावेश आहे.

इनामी जमीन सर्वे नं. २१० क्षेत्र २९ एकर ०९ गुंठे शासन राजपत्रात प्रसिध्द न झाल्याने वक्फ़ अधिनियम १९९५ चे कलम ४० अन्वये केस क्र. ४०/१८६/२०१२, दि. २०/०६/२०१३ संपुर्ण चौकशी होवुन सर्वे नं. २१० क्षेत्र २९ एकर ०९ गुंठे वक्फ़ प्रॉपर्टी घोषीत करुन वक्फ़ मंडळात नोंदणी करण्यात आली आहे.

सदर निर्णयाविरोधात महानगर पालीका व इतर यांनी मा. वक्फ़ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे दावा दाखल केला होता सदर दावा मा. वक्फ़ न्यायाधिकरण औरंगाबाद यांनी फ़ेटाळला आहे.

सद्यस्थितीत वक्फ़ मंडाळातर्फ़े सर्वे नं. २१० मधिल १) महाराष्ट्र शासन तर्फ़े जिल्हा अधिकारी औरंगाबाद २) कुबेर सुलोशिस रुग्नालय ३) सिटी. क्लब ४) महानगर पालीका ५) शासकीय महाविद्यालय ६) उपसंचालक पब्लिक हेल्थ यांनी सन १९७१ मध्ये झालेल्या सर्वेक्षणामध्ये सिटी सर्व्हे मध्ये त्यांचे नाव टाकुन विविध क्षेत्रावर आखिव पत्रिका (पी.आर.कार्ड) बनवीले आहे. त्यांच्याविरुध्द वक्फ़ मंडाळातर्फ़े अधिक्षक भुमी अभिलेख औरंगाबाद यांच्या कार्यलयास रितसर अपील दाखल करुन वरील सर्व विभागाचे नाव कमी करुन वक्फ़ मंडाळाच्या नाव लावणे बाबत कार्यवाही चालु आहे.

यात आयुक्त महानगर पालिका तर्फ़े स्मार्ट सिटीचे कार्य चालु असुन या बाबत आयुक्त महानगर पालीका विरुध्द वक्फ़ बोर्डातर्फ़े स्मार्ट सिटीचे बिल्डींग चे काम करु नये म्हणुन व वक्फ़ मंडाळानी स्थगिती आदेश वक्फ़ न्यायाधिकरण कडुन घेतला असुन त्यांच्या विरोधात आयुक्त महानगर पालीका मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रुजु होवुन वक्फ़ न्यायाधिकरण ने दिलेले स्थगितीला रद्द करण्यास विनंती केली परंतु मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी मा. आयुक्त यांची विनंतीना मंजुर करुन त्याची याचिका फ़ेटाळली आहे. स्मार्ट सिटीचे चालु असलेले अनधिकृत काम न करणेसाठी व न्यायालयाचे स्थगिती आदेशाप्रमाणे काम बंद न करता चालु ठेवणे बाबत मा. आयुक्त मनपा च्या विरोधात योग्य ते कार्यवाही करण्यासाठी या कार्यलयातर्फ़े तिन वेळा पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन बेगमपुरा औ.बाद यांना सुचित करण्यात आले आहे.

वक्फ मंडळाकडे सदर वक्फ संस्थेवर सद्यःस्थितीत श्री. खैसर खान यांच्या नियुक्ती बाबत जाहीर प्रगटन देण्यात आलेले आहे. अद्याप कोणालाही मुतवल्लीची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

जामा मस्जिद औरंगाबाद चे संबंधित असलेली इनामी जमीन सर्वे नं. २१० क्षेत्र २९ एकर ०९ गुंठे (आमखास मैदान) ही वक्फ़ संस्था सन २०१३ पासुन प्रत्यक्षकपणे महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळाच्या ताब्यात आहे. तथापि वक्फ़ अधिनियम १९९५ च्या कलम ६५ मधिल तरतुदीनुसार विहित प्रक्रिया पार पाडुन सदर संस्थाची वक्फ़ मंडळाच्या थेट नियंत्रणाखाली घेण्याची कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. सदरची कायदेशीर त्रुटी दुर करण्याच्या दृष्टीने वक्फ़ अधिनियम १९९५ च्या कलम ६५ मधिल तरतुदीनुसार सदर संस्था वक्फ़ मंडाळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत चा प्रस्ताव वक्फ़ मंडाळाच्या बैठीकीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. २६:- **जामा मस्जिद व कब्रस्तान, बुढ्ढीलेन, औरंगाबाद ही वक्फ संस्था व या संस्थेची वक्फ मालमत्ता सर्वे नं. २१० मधील आमखास मैदानाची, २९ एकर ०९ गुंठे या मालमत्तेसह इतर सर्व मालमत्ता वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडाळाच्या रास्त निगराणीत घेण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

विषय क्र. २७ :- **ताबुत इनाम इडोमेंट ट्रस्ट, मौजे माण, ता.मुळशी जि.पुणे ही वक्फ संस्था, वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत.**

ताबुत इनाम इडोमेंट ट्रस्ट, मौजे माण, ता.मुळशी जि.पुणे ही संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे क्र.MSBW/PUN/१३१/२००९ दि.१९/०५/२००९ अन्वये नोंदणीकृत आहे. या वक्फ संस्थेशी संबंधित वक्फ मिळकत सर्वे नं. ३३४, ३३५/१ वक्फ संस्थेची मालमत्ता आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी सर्वे नं. ३३५/१ मधील ५ हेक्टर ५१ आर एवढी जमीन संपादित केलेली आहे. सदर कार्यवाही उपजिल्हाधिकारी, भुसंपादन क्र.१३, पुणे यांच्याकडे करण्यात आली असुन त्याबाबत उपजिल्हाधिकारी, भुसंपादन-१३, पुणे यांनी क्र.SLAO/१३/SR/३०/२०२० दि.११/१२/२०२० अन्वये रु. ९,६४,४२,५००/- इतका मावेजा देण्याबाबत निवाडा देवून आदेश पारित केले आहेत. या वक्फ मिळकतीचा मावेजा मिळविण्यासाठी इम्तियाज मोहम्मद हुसेन शेख रा. येरवडा, पुणे व त्यांचे साथीदार यांनी दि.२२/०१/२०२१ रोजीचे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे खोटे व बनावटी नाहरकत पत्र खोटी सही व शिक्कयानिशी वापरुन त्याचा गैर फायदा घेण्यासाठी उपजिल्हाधिकारी, भुसंपादन क्र.१३, पुणे या कार्यालयात सादर करुन धनादेश क्र.११०५५९ दि.३०/१२/२०२० द्वारे रु.७,७६,९८,२५०/-इतका मावेजा त्यांना उचलला आहे. इम्तियाज मोहम्मद हुसेन शेख रा. येरवडा, पुणे हे सदर वक्फ संस्थेचे विश्वसत नाहीत. तथापि बनावट नाहरकत प्रमाणपत्र सादर करुन त्यांनी व त्यांचे साथीदार यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ व महाराष्ट्र शासन यांची फसवणुक केली आहे म्हणुन त्यांच्या विरुध्द वक्फ कायद्यांतर्गत तसेच फसवणुक, खोटे व बनावटी दस्त तयार करणे इत्यादी गुन्ह्यांसदर्भात भारतीय दंड संहिता मधील संबंधित तरतुदीनुसार संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये फौजदारी गुन्हा (FIR) दाखल करण्यात आला आहे.

ताबुत इनाम इंडोमेंट ट्रस्ट मौजे माण ता.मुळशी जि.पुणे या वक्फ संस्थेचे सन २०१६ ते २०२१ या कालावधीतील व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या नियुक्ती बाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कार्यालयात अनेक दावे/प्रतिदावे सादर करण्यात आलेले आहेत.

वर नमुद प्रकरणात ताबुत इनाम इंडोमेंट ट्रस्ट मौजे माण ता.मुळशी जि.पुणे या वक्फ मिळकतीचे गैर कायदेशिर व्यवहार होत असल्याने वक्फ संस्थेचे व्यवस्थापन वक्फ मंडळाने आपल्या ताब्यात घेणे आवश्यक आहे त्यासाठी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६५ नुसार वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत सदर विषय वक्फ मंडळाच्या समोर सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक. २७:- **ताबुत इनाम इडोमेंट ट्रस्ट, मौजे माण, ता.मुळशी जि.पुणे ही वक्फ संस्था, वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. सन २०१२-२०१३ मध्ये सदर संस्थेची मंजूर करण्यात आलेल्या योजनेत एकाच कुटुंबातील सदस्यांची व्यवस्थापन समितीत नियुक्ती करण्याची तरतूद असल्याने सदरची योजना कायदेशीर प्रक्रिया राबवुन रद्द करुन नवीन सुधारीत योजना तयार करुन व्यवस्थापन समिती नियुक्त करण्यासाठी निवडणूक घेण्याची कार्यवाही तीन माहिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी. दरम्यानच्या कालावधीत सदर संस्थेचे व्यवस्थापन प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांच्या सुपुर्द करण्यात यावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र. २८ :- आलमगीर मस्जीद ट्रस्ट, कोंढवा (बु) ता.हवेली जि.पुणे ही वक्फ संस्था, वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत.**

आलमगीर मस्जीद ट्रस्ट, कोंढवा (बु) ता.हवेली जि.पुणे ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-४९२ अन्वये नोंदणकृत असुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४३ अन्वये क्र. MSBW/PUN/१३२/२००९ अन्वये रितसर नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर संस्थेच्या संबंधित असलेली स.न. ५५ क्षेत्र ४६ एकर जमीनीची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यांत आलेली आहे. सदरील वक्फ संस्थेच्या मिळक्ती सर्रास अतिक्रमणे व बेकायदेशीर व्यवहाराद्वारे हस्तांतरण होत आहे तसेच संबंधित विभागाकडून बांधकाम परवानग्या व विद्युत पुरवठा होत आहे. या प्रकरणी बेकादेशीर बांधकाम व हस्तांतरण व्यवहार थांबविण्यासाठी अनेक वेळा संबंधित विभागांना पत्र व्यवहार करण्यात आले आहे परंतु त्यावर कोणतीच कार्यवाही होत नाही.

सदर संस्थेच्या परिशिष्ट अ नुसार श्री. ॲड. जहांगीर इब्राहीम व इतर यांची नियुक्ती व्यवस्थापन म्हणून सहाय्यक धर्मदाय आयुक्त पुणे यांनी केलेली आहे. सदर व्यवस्थापन समिती सद्याकार्यरत आहेत. सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीचा प्रस्तावित योजना अर्ज श्री. सलीम बाबा लाल मुल्ला यांनी दि. २७/८/२०२० रोजी दाखल केलेले आहे. प्रकरणात मोहम्मद हनिफ अब्दुल शेख यांनी दि. १२/४/२०२१ रोजी सदर योजना अर्जावर आक्षेप दाखल केले आहे. तसेच सदर संस्थेच्या दुसरा प्रस्तावित योजना अर्ज श्री. साहील मुन्ना खान व इतर यांनी दि. ०५/०१/२०२१ रोजी दाखल केलेले आहे. सद्या वक्फ मंडळाकडे सदर वक्फ संस्थेवर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये कोणतीही नविन नियुक्ती किंवा योजना मंजूर करण्यात आलेली नाही.

वर नमुद प्रकरणात आलमगीर मस्जीद ट्रस्ट, कोंढवा (बु) ता.हवेली जि.पुणे या वक्फ संस्था व त्याच्या मिळकतीचे गैर कायदेशिर व्यवहार होत असल्याने वक्फ संस्थेचे व्यवस्थापन वक्फ मंडळाने आपल्या ताब्यात घेणे आवश्यक आहे यासाठी प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांनी त्यांचे पत्र क्र. चौकशी /३२५/२०२१ दि. ०३/०७/२०२१ अन्वये सदर संस्थेला वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६५ नुसार वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत शिफारस केली आहे. सदर विषय वक्फ मंडळाच्या समोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक. २८:-** **आलमगीर मस्जीद ट्रस्ट, कोंढवा (बु) ता.हवेली जि.पुणे ही वक्फ संस्था, वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. सदर संस्थेची योजना मंजूर करण्याची कार्यवाही पूर्ण करुन व्यवस्थापन समिती नियुक्त करण्यासाठी निवडणूक घेण्याची कार्यवाही तीन माहिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी. दरम्यानच्या कालावधीत सदर संस्थेचे व्यवस्थापन प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांच्या सुपुर्द करण्यात यावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**ठराव क्रमांक २९ :-** **दर्गाह हजरत मौलाना साहेब (मोईजोद्दीन साहेब) साहेब दर्गाह खुतबोद्दीन साहेब, मस्जीद, दर्गाह बिबीयानी, सराय व कब्रस्तान, पैठण, ता. पैठण, जि. औरंगाबाद या वक्फ संस्थेच्या मालकीच्या २४ एकर वक्फ जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे व त्यापैकी ९ एकर जमिनीवर प्लॉटींग होत असल्याचे निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ नुसार कार्यवाही सूरु आहे. सदर प्रकरणी अतिक्रमण हटविण्या संदर्भात व बेकायदेशीर प्लॉटींगची कार्यवाही थांबिण्याबाबत सर्व संबंधीत महसूली अधिकारी व पोलीस अधिका-यांना वक्फ मंडळाचे सदस्य असलेले खासदार द्वय व आमदार महोदयांच्या सहीची पत्रे देण्यात यावीत, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

**ठराव क्रमांक ३०:-** **श्री. इफ्तेखारुल्लाह बेग, सेवा निवृत्त लघु लेखक यांच्या विरूध्दच्या विभागीय चौकशीचा अहवाल दिनांक ३०.०९.२०२१ रोजी वक्फ मंडळात प्राप्त झालेला आहे. सदर अहवालात चौकशी अधिकाऱ्यांनी श्री. बेग यांना झालेल्या काही अतिप्रदानाच्या रकमा व इतर काही रकमा त्यांच्या कडून वसूल केले जाणे आवश्यक असल्याचे अहवालात नमूद केले आहे. त्यांना अनुज्ञेय असलेल्या निवृत्ती लाभांच्या रकमांपैकी रोखून ठेवण्यात आलेल्या रक्कमे पेक्षा त्यांच्या कडून वसुली पात्र रक्कम जास्त निघाल्यास, सदर जास्तीची रक्कम श्री. बेग हे मागणी करण्यात आल्यापासून १५ दिवसाच्या आत वक्फ मंडळ कार्यलयात जमा करतील अशा अर्थाचे श्री. बेग यांच्या कडून क्षतिपुर्ती बंधपत्र (Indemnity Bond) घेवून, त्यांना देय ठरत असलेल्या निवृत्ती लाभांच्या उर्वरित रक्कमेपैकी ५०% इतकी रक्कम श्री. बेग यांना प्रदान करण्यात यावी, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. श्री. बेग यांच्या कडून वसूली पात्र असलेली रक्कमांची वसुली करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात येत असून अशा वसुलीसाठी वक्फ मंडळाची पुन्हा**

मान्यता घेण्याची आवश्यक्ता असणार नाही, असा ठराव देखील एकमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३१:-** वक्फ मंडळाच्या वकीलांच्या पथकात नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने संबंधीत उमेदवारांच्या मुलाखती घेवून निवड सुची तयार करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरून करावी. सदरच्या कामी सन्मानीय सदस्य ॲड. श्री. ए.यु.पठाण व ॲड. श्री. खालीद बाबु कुरेशी या सदस्यांना देखील निमंत्रीत करण्यात यावे, तथापि, कोणत्याही कारणामुळे सदस्यांना उपस्थित राहणे शक्य न झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहिलेल्या सदस्यासमवेत किंवा दोन्ही सदस्य अनुपस्थित राहिल्यास एकट्याने वरील कार्यवाही पूर्ण करावी, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३२: -** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या दिनांक ०१.०९.२०२१ रोजी झालेल्या बैठकीपुढे सादरीकरण करण्यात आलेला "SHIFAA" या प्रकल्पाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात यावा, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

| अ. क्र. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | मा. डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. अध्यक्ष, | |
| २ | मा. ॲड. ए. यु. पठाण,<br>मा. सदस्य | |
| ३ | मा. खासदार डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. सदस्या, | |
| ४ | मा. खासदार सय्यद इम्तियाज जलील<br>मा. सदस्य | |
| ५ | मा. ॲड. खालीद बाबू कुरैशी<br>मा. सदस्य | |
| ६ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य | |
| ७ | मा. इम्तियाज मुश्ताक काझी,<br>सह सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग<br>तथा मा. सदस्य | 8/10/21 |
| ८ | मा. समीर गुलामनबी काझी,<br>मा. सदस्य, | |
| ९ | मा. ~~मौलाना~~ Shaikh हसनैन शाकीर,<br>मा. सदस्य | |
| १० | मा. मौलाना सय्यद अतहर अली,<br>मा. सदस्य | |
| ११ | श्री. अनिस शेख,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी | |

for No-25, I have told for action u/s 54, However I do not support Sec 65.